**नियमीत दिवाणी दावा क्र.११/२०२० मधील**
**निशाणी क्र.२२ वर आदेश**
**CNR-MHLA110000102020**

---

०१. सदरचा अर्ज वादीनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ खालील तरतुदीनुसार दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, दावा प्रलंबित असताना वादीने प्रतिवादी क्र.४ कडुन २० आर क्षेत्र खरेदी केलेले आहे. त्याअनुषंगाने दुरुस्ती करण्यासाठी प्रस्तूतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०२. सदर अर्जाला प्रतिवादींनी हरकत नोंदवून अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्ज दाखल करण्यास उशिर केलेला आहे. जर अर्ज मंजूर केला तर दाव्याचे स्वरुप बदलणार आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केलेली आहे.

०३. सदर अर्जामधील व म्हणण्यामधील कथन विचारात घेवून सदरचा अर्ज निकाली काढण्याकरिता मी खालील मुद्दे विचारात घेतले आहेत. सदर मुद्दयांना कारणासहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जात नमुद प्रस्तावित दुरुस्ती ही पक्षकारांमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण करण्यासाठी आवश्यक आहे का? | होकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**<u>का र ण मी मां सा</u>**

०४. सदर प्रकरणातील पक्षकारांतर्फे विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

**<u>मुद्दा क्र.१ करिता</u> –**

०५. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरुन याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सदरचा दावा वादीने निरंतर मनाईसाठी व हददी कायम करण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे सदर प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप व दोन्ही बाजुच्या वकीलांचा युक्तीवाद विचारात घेऊन याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, पक्षकारांमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण होण्याकरीता व प्रकरणांची संख्या टाळण्याकरीता वादीला अर्जात नमुद केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्याने प्रतिवादींचे अपरिमित असे नुकसान होणार नाही. तसेच अर्जात नमूद प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपामध्ये बदल होणार नाही. याउलट, सदरचा अर्ज नामंजुर केल्यास प्रकरणामध्ये गुंतागूंत वाढुन प्रकरणाची संख्या वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे सदर दाव्याचे स्वरुप, पक्षकारांमधील वादाचे स्वरुप, प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप व नैसर्गिक न्यायाचे तत्व विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, पक्षकारांमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण करण्यासाठी अर्जात नमूद प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्यामध्ये नमूद असणे आवश्यक आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ला होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करिता</u> –**

०६. वर नमुद चर्चेवरुन स्पष्ट होते की, सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१.नि.क्र.२२ वरील अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येतो.

२.वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरूस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत पुढील तारखेपर्यंत प्रकरणात दाखल करावी.

Digitally signed by KALIDAS SIDRAM SURYAWANSHI
Date: 2022.04.04 16:29:58 +0530

(के. एस. सुर्यवंशी)

दिनांकः०४.०४.२०२२ दिवाणी न्यायाधीश व. स्तर निलंगा.